
जलसंवाद (इंटरनेट अंक)
पुणे. वर्ष पहिले. ऑगस्ट २०२१. अंक
पृष्ठसंख्या : ३२. वार्षिक वर्गणी: रुपये १०० फक्त

# जलसंवाद

पाणी प्रश्नावर मंथन घडवून आणण्यासाठी
व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे मासिक

संपादक: डॉ. दत्ता देशकर, श्री.सतीश खाडे



## कव्हरस्टोरी

## कुमारांना घालून साद, शिक्षिकेने उठविले रान, झाले वर्षभर सर्वत्र जलसाक्षरता अभियान

# पाणी: शुल्क आणि मूल्य

**डॉ. गुरुदास नूलकर**

**मो : ९८२२०३४५७९**



(लेखक सिमबायोसिस विद्यापीठात प्राध्यापक आहेत आणि इकॉलॉजीकल सोसायटीचे विश्वस्त आहेत. शाश्वत विकासासाठी पर्यायी अर्थव्यवस्था कशी असावी या विषयात त्यांचा अभ्यास आहे. 'अनर्थशास्त्र' या त्यांच्या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा २०१९ सालचा राज्य वंदगम्य पुरस्कार मिळाला आहे. महानुभाव, वनराई, साधना, पालकनीती, आजचा सुधारक आशा मासिकांतून त्यांचे लेखन नियमित प्रसिद्ध होत असते. त्यांचे शोधनिबंध टेलर अँड फ्रांसिस, स्प्रिंगर, सेज आशा अंतरराष्ट्रीय जर्नल मधून प्रकाशित झाले आहेत. )

गोडं पाणी – जलचक्राच्या कृपेने सजीवसृष्टीला लाभणारे एक जीवनदाई द्रव्य. आपल्या देशात शेत व्यवसायात गुंतलेली ५८ टक्के जनता उपजीविकेसाठी याच पाण्यावर अवलंबून आहे. पाण्याच्या उपलब्धतेवर लाखो शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती ठरते. उष्णकटिबंध हवामान आणि मौसमी पाऊसाच्या आपल्या देशात याचा वापर नियंत्रित असायलाच हवा. अर्थव्यवस्थेत एखाद्या वस्तूच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्याच्या किमतीचा किंवा त्यावर कर आकारणीचा करून करता येतो. पण पाण्याच्या बाबतीत आपल्याकडे हे आज पर्यंत शक्य झालेले नाही. धरणातील पाणी साठ्याच्या वितरणाचे नियम आहेत, त्याला शुल्क लावला जातो आणि काही प्रमाणात वापराचा हिशोबही ठेवला जातो. पण भूजल स्रोतांच्या वापराला ना किंमत मोजावी लागते ना निर्बंध आहेत. या निकडीच्या संसाधनाची किंमत त्याच्या उपयुक्ततेच्या तुलनेत इतकी नगण्य आहे की तिचा काटकसरेने वापर होण्याची सुतराम शक्यता नाही. आणि त्यातही लाखो लोक एन–केन मार्गाने पाणी फुकट वापरत असतील तर दरवर्षी पाणी टंचाई होते, यात काहीच नवल नाही.

**सशुल्क आणि निशुल्क पाणी :**

पाणी राज्याचा विषय असल्यामुळे शेती आणि औद्योगिक वापराचे दर महाराष्ट्र वॉटर रिसोरसेस रेग्युलेटोरी अथॉरिटी (एम.डब्लीव.आर.आर.ए) ठरवते, तर घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठी गाव पातळीवर स्थानिक प्रशासन ठरविते. पण दोन्ही संस्थांकडे पाणी वापर मोजण्याची खात्रीशीर यंत्रणा ही नाही आणि न्याय अंमलबजावणी करण्याची क्षमताही नाही. शहर आणि ग्रामीण भागातून ठिकठिकाणी पाण्याची चोरी होते. काही थोड्याच घरातून पाण्याचे मीटर आहेत आणि इतर ठिकाणी घरपट्टीतून ढोबळ मानाने आकारणी केली जाते. ही व्यवस्था झाली भूपृष्ठावरच्या पाण्याची. पण या पेक्षा कित्येक पट जास्त वापर भूजल साठ्यातून होतो. हरित क्रांतीच्या वाढीव पीक उत्पादकतेसाठी पाण्याचा वापर वाढला. यानंतर विहिरी आणि कूप नलिकांची संख्या वाढतच गेली. आज अनेक ठिकाणी भूजल पातळी पन्नास टक्क्याहून जास्त घटली आहे. पुढील तक्त्यातील आकडेवारी एक्राडॅमचे डॉ. हिमांशु कुलकर्णी यांच्या अभ्यासातून आली आहे.

**निसशुल्क पाणी वापर**

| | |
|---|---|
| ग्रामीण भागातील पिण्याचे पाणी | ८० ते ९५ टक्के भूजल स्रोतातून वापर |
| शेतीचा पाणी वापर | ६० – ७० टक्के भूजल स्रोतातून वापर |
| शहरी भागातील पिण्याचे पाणी | ४८ टक्के भूजल स्रोतातून वापर |
| औद्योगिक वापर | याची आकडेवारी उपलब्ध नाही |

प्रत्येक राज्यात भूजल स्रोताच्या वापराची नियमावली आहे, पण शुल्क कुठेही नाही. या नियमावलीची अंमलबजावणी करणे इतके क्लिष्ट आणि अवघड आहे की बहुतांश ठिकाणी भूजलाचा वापर बेकायदेशीरपणे चालतो, आणि सरकारच्या अनुदानित वीज धोरणामुळे उपसा वाढत जातो.

म्हणजे ज्याचा सर्वाधिक वापर होतो, ते पाणी निशुल्क आहे, आणि सशुल्क पाण्याची किंमत पूर्ण वसूल होत नाही. इतकेच नव्हे, तर याचे दर अवास्तव कमी आहेत, ज्यामुळे पाणी जपून वापरण्याचे प्रयत्नही केले जात नाहीत. घरगुती आणि व्यावसायिक वापराची पाणीपट्टी सुद्धा अशीच अवास्तविक कमी आहे. त्यामुळे उद्योग–धंद्यांना पाणी शुद्ध करून पुनरवापर करणेही परवडत नाही! बांधकामात पिण्याच्या आणि वापराच्या पाण्याचे नळ वेगळे नसतात आणि पुनरवापर अशक्य असतो. त्यामुळे पाण्याचा नॉन–कन्झंपटिव्ह वापर (स्वयंपाक आणि पिण्या व्यतिरक्त) भरमसाठ वाढून बसतो आणि सांड पाण्यामुळे शहरांतल्या नद्यां बारमाही वाहू लागतात.

**पाण्याचे राजकारण :**

तर मग अधिकाऱ्यांना पाणी शुल्क योग्य का ठेवता नाही? जलसंवादच्या सूज्ञ वाचकांना सांगण्याची गरज नाही की 'पाण्याचे राजकारण' हे त्याचे सोपे उत्तर आहे. पाण्याच्या असमतोल आणि अयोग्य वितरणामुळे देशातील शेतकऱ्यांच्यात इतकी गरिबी पसरली आहे की शेतीला पाणी मोफत देण्याचे आश्वासन जो देईल त्याला मतं मिळतात. जर का सरकारने दर वाढविण्याची चूक केलीच तर विरोधी पक्षाकडून टीकेचा भडिमार होतो. पाण्याचा दर ठरविण्यासाठी अनेक समित्या बसल्या पण परिस्थितीत काही बदल झालेला नाही, कारण आपल्याकडे पाणीपट्टीचा विषय भावनिक मार्गाने हाताळला जातो.

स्वातंत्र्यापासून आजपर्यंत अल्पभूधारक आणि भूमिहीन शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती इतकी खालावली आहे की आज त्यांना पाणी विकत देणे हा खरंतर घोर अन्याय आहे.

सूर्यप्रकाश, हवा आणि पाणी यांना अर्थशास्त्रात 'ग्लोबल पब्लिक गुड्स' म्हणजे जागतिक सार्वजनिक संसाधने म्हटलं जातं. यावर कोणाचीही मालकी नसते आणि जीवसृष्टीच्या गरजेपेक्षा ही संसाधने निसर्गात अनेक पट जास्त उपलब्ध आहेत. पण अयोग्य वापर, अतिरेकी प्रदूषण आणि हवामान बदलाने विस्कटलेल्या जलचक्रामुळे दरवर्षी गोड्या पाण्याचा तुटवडा होत आहे. याचा परिणाम म्हणजे आज बाजारपेठेत पाण्याची सर्रास विक्री होते. 'टँकर माफिया' ही संज्ञा हल्ली वारंवार कानावर पडते.

देशातील गोड्या पाण्याचा सर्वाधिक वापर शेतीत होतो. त्यामुळे हा वापर जर अनियंत्रीत असला तर पाणीटंचाई येणार हे निश्चित. आपल्या शेतीत प्रामुख्याने दोन कारणांमुळे पाणी वापर वाढतो (अ) हवामानावर अवलंबून असलेल्या पारंपारिक पीक पद्धती झुगारून बाजारपेठेच्या मागणीवर पीक नियोजन केल्यामुळे – भारताच्या राज्यात उष्णता आणि पर्जन्यमानांत प्रचंड फरक आहे. ठिकठिकाणी मातीची पोत बदलते. या फरकांमुळे देशाचे १५ एग्रो क्लायमॅटिक विभाग होतात. याच वैविध्याचा विचार करून पारंपारिक शेती केली जात होती. पाण्याच्या उपलंबधतेनुसार पिके घेतली जात होती आणि वापर कटकसरीने केला जात असे. मागील लेखात पाहिल्या प्रमाणे हे बदलण्यात ईस्ट इंडिया कंपनीचा हात होता. इंग्लंडमध्ये चालू झालेल्या औद्योगीकीकरणाला कच्चामाल पुरविण्यासाठी कापूस, मसाले, नीळ, जूट, तंबाखू, चहा, कॉफी अशी लागवड सुरू झाली. मोठी धरणे आली आणि पाण्याची उपलब्धता काही ठराविक ठिकाणी वाढली. या भागात शेतकरी सधन झाले आणि त्यांचा पाण्याचा वापरही वाढला. स्वातंत्र्यानंतरही शेतीत बदल होत राहिले. साखर कारखाने वाढले आणि हरित क्रांतीचा रेटा सुरू झाला. ज्या गोष्टीला बाजारपेठेत जास्त भाव मिळे त्याचे उत्पादन वाढले. हे स्वाभाविकच होते, पण आता भूजलाचा वापर वाढत गेला. जमिनी खालचा साठा एकेठिकाणी उपसला की दुसरीकडे कमी पडू लागतो आणि पाण्याची उपलब्धता अधिक विषम होत गेली. (ब) अकार्यक्षम सिंचन पद्धतींचा वापर – बहुतांश शेतकऱ्यांकडून गरजेपेक्षा जास्त पाण्याचा वापर होतो. मोकाट सिंचनात बाष्पीभवन आणि झिरपण्यातून पाणी वाया जाते. मल्चिंग आणि ठिबक सिंचनाचा वापर फक्त काही थोड्या शेतकऱ्यांकडून होतो. ठिबक सिंचनाला अनुदान आहे, पण त्याचा फायदा मोठे आणि शहराजवळचे शेतकरी करून घेतात. देशाच्या काना कोपऱ्यात या योजना पोचतच नाहीत.

**पाण्याचे दर :**

एखाद्या वस्तूची किंमत ठरवताना त्यासाठी झालेले सर्व खर्च विचारात घ्यावे लागतात. त्यात मुख्यतः गुंतवणुकीवर परतावा किती हवा, उत्पादन, वितरण, पणन, सांभाळ आणि डागडुजी यासाठी किती खर्च अपेक्षित आहे आशा गोष्टींची गणना होते. अर्थात, पाण्यासारख्या सार्वजनिक संसाधनाचे दर ठरविताना फक्त आकडेवारीवर विसंबून राहता येत नाही. त्यात सामाजिक आणि स्थानिक परिस्थितीचा विचार, अनुभवाचा आधार, समता आणि समन्यायी तत्वांचा वापर या ही गोष्टी आणाव्या लागतात. परंतु आपल्याकडे खर्चाची आकडेवारी डावलून पाण्याचे दर ठरविले जातात. त्यामुळे शुल्क काही पैशात आकरले जाते. वेळोवेळी यात वाढ होते, पण ती किरकोळ असते कारण मोठे बदल राजकीय वर्तुळात न पचण्यासारखे असतात. पाणीपट्टी वसूलीसाठी एमडब्ल्यूआरआरए कडून व्हॉल्यूमेट्रिक प्राईसिंग (घनमापन) पद्धत वापरली जाते. शंभर टक्के वसूली झाली तरी खर्चही निघणार नाही, हे माहीत असतं. पण वसूलीसाठी राज्य सरकारकडे योग्य आणि पुरेशी यंत्रसामग्री आणि मनुष्यबळ नाही, त्यामुळे किती टक्के वसूली झाली याची खात्रीशीर आकडेवारी मिळत नाही. पाणीपट्टी पेक्षा कित्येक पट जास्त खर्च वसूलीचा असतो. याची नोंद खुद्द एमडब्ल्यूआरआरएच्या अहवालात आहे. तसेच, शहरी पाणीपट्टीतून नगरपालिकेचा पाणी शुद्धीकरण आणि वितरणाचा खर्च निघत नाही. अशाने पाणी वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण तर सोडाच, पण डागडुजीसाठी पैसाही केंद्र सरकारकडे मागावा लागतो. या तोट्याच्या गणिताचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे पाणी वितरण व्यवस्था अन्यायकारक होत जाते.

जलतज्ञ आणि वाल्मी संस्थेचे माजी प्राध्यापक श्री प्रदीप पुरंदरे यांचा या विषयात सखोल अभ्यास आणि गाढा अनुभव आहे. वेळोवेळी त्यांनी सरकारी संस्थांना आकडेवारी देऊन सुधारणा सुचवल्या आहेत. पुरंदरे यांच्या अभ्यासातून स्पष्ट दिसते की राज्य सरकारकडे अंमलबजावणी करण्याची यंत्रणा कमकुवत असल्यामुळे सर्रास पाण्याची चोरी आणि अपव्यय होत आहे. भिजलेले क्षेत्र आणि वापरलेले पाणी यांची प्रत्यक्ष मोजणी होत नाही. सरकारकडे थकबाकीदारांची यादी नाही. शेतकऱ्यांना आणि सामूहिक लिफ्ट योजनांना बिलं वेळेत मिळत नाहीत. पाण्याच्या वापरकरत्यां बरोबर जे करार व्हायला हवेत ते पूर्णपणे राबविले जात नाहीत. घनमापन पद्धतीच्या मर्यादा लक्षात घेऊन पुरंदरे यांनी पर्यायी मार्ग ही सुचविले आहेत. अर्थतज्ञ डॉ. अभय पेठे यांनी पाणीपट्टीवर अर्थशास्त्राच्या दृष्टीकोनातून सूचना केल्या आहेत. ते म्हणतात, पाणीपट्टी जेव्हा अवास्तव कमी ठेवली जाते तेव्हा वितरण कामाच्या पूर्ततेत लागणाऱ्या सेवा बेभरवशाच्या होतात आणि दर्जा खालावतो. असुरक्षित पाणीपुरवठ्याचा सर्वाधिक तोटा गरीब आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना होतो. वसुली पुरेशी होत नसल्याने नवीन विकास कामावर खर्च करण्याच्या क्षमतेवर विपरीत परिणाम होतो.

शेतव्यवसाय हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा पाया मानला जातो, आणि पाणीपुरवठा हा शेतीचा पाया आहे. यात कारभार ढिसाळ झाला की त्याचे पडसाद अर्थव्यवस्थेत आणि सामाजिक विषमतेतून स्पष्टपणे दिसून येतात.

**बाजारपेठेतील किंमत आणि पाण्याचे मूलभूत मूल्य :**

मुक्त बाजारपेठ अर्थव्यवस्थेत एखाद्या वस्तूची किंमत किमान तीन गोष्टींवर अवलंबून असते (अ) त्या वस्तूला मागणी किती आहे (ब) पुरवठा करणारे किती आहेत (क) इतरांच्या तुलनेत आपल्या वस्तूतील वैशिष्ट्य (differentiated value) काय आहेत. जर त्या वस्तूला प्रचंड मागणी असली, पुरवठा करणारे मुबलक असले आणि स्पर्धकांमध्ये फार फरक नसला तर मागणी आणि पुरवठ्यावर बाजारपेठेतली किंमत ठरते. जर मागणी प्रचंड असली पुरवठा करणारे

ही मुबलक असले पण आपल्या वस्तुत काही ठळक वैशिष्ट्य असतील तर त्याला जास्त किंमत मिळू शकते. याला ब्रँड व्हॅल्यू असे म्हणतात. पाण्याच्या बाबतीत हे शक्य नसते.

बाजारपेठेत ठरलेली किंमत ही वस्तूची एक्सट्रिंसिक व्हॅल्यू असते. म्हणजे त्या वस्तूचे मूलभूत मूल्य नसून बाजारपेठेच्या मागणी–पुरवठा रस्सीखेचेतून ठरलेली किंमत असते. पण ग्राहकांचा असा समज होतो की वस्तूच्या किंमतीतून त्याचे मूल्य प्रकट होते. सामान्य माणसांना महागड्या गाड्या, उंची कपडे, किमती हॉटेलं अशा गोष्टी अधिक मौल्यवान वाटतात. पाण्याच्या मागणीचा  पुरवठा फक्त सरकार करू शकते (बाटलीबंद पाणी आणि टँकर विक्री सारखे काही अपवाद वगळता). हे सार्वजनिक जीवनावश्यक संसाधन सर्वांना रास्त किमतीने समान उपलब्ध व्हावे या उद्देशाने सरकार किंमत ठरविते. शेतीच्या वापरात हजार लिटर पाण्याला फक्त काही पैसे शुल्क आहे. या किमतीतून पाण्याचे खरे मूल्य जाणवत नाही. धरणामुळे पाणी साठा वाढला की कोरडवाहू भागातही ऊस आणि भाताची लागवड सुरू होते, मोकाट सिंचन करणं अधिक सोयीस्कर होतं आणि पीक नियोजन व पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापन वाऱ्यावर सोडलं जातं. ग्रामीण भागाची पुनरावृत्ति शहरात होते. उच्चभ्रू वस्तीत मोठ्या बंगल्यातून राहणाऱ्या लोकांच्या खिशाला चार–पाचशे रुपये पाणीपट्टी जाणवतही नाही. रोज दोन–तीन गाड्या धुणे, पिण्याचे पाणी बागेत वापरणे, शीळं पाणी (पाणी शीळं होत नाही) ओतून देणे अशा गोष्टी सर्रास चालू असतात. हॉटेल, मंगल कार्यालये, गाडी आणि कपडे धुलाई केंद्र, ब्युटी पार्लर.... अशा व्यावसायिक वापरकर्त्यांकडून अकाउंटिंग मध्ये पाणीपट्टीचा खर्च घेण्याचे कष्टही केले जात नसतील! प्रशासनाने बांधील केले नाही तर त्यांच्याकडून पाण्याचा काटकसरीने वापर किंवा पुनर्वापर होणे शक्यच नसते.

या संगळ्याचे मूळ म्हणजे पाण्याच्या किमतीतून त्याचे मूल्य प्रकट होत नाही. उलट गोड्या पाण्याला काहीच किंमत नाही, असा भास पाणीपट्टीतून होतो. गोड्या पाण्यामुळे जीवसृष्टी पोसली जाते, आपला अन्नपुरवठा होतो आणि मानवी उद्योग धंदे चालू शकतात. याचा तुटवडा झाला की जनता हवालदिल होते आणि सरकारला पाण्यासारखा पैसा ओतावा लागतो. पाण्याचे जीवनदायी मूल्य मानव निर्मित पैशात मोजता येणे केवळ अशक्य आहे.

अर्थशास्त्रात स्केअरसिटी व्हॅल्यू नावाची संकल्पना आहे. एखाद्या वस्तूचा तुटवडा भरून काढण्यास होणारा खर्च हे त्या वस्तूचे टंचाई–मूल्य असते. गेले काही वर्ष महाराष्ट्राच्या अनेक भागात सातत्याने पाणी टंचाई होत आहे. काही ठिकाणी पेरणी वाया जाते तर कुठे कुटुंब गरिबीत ढकलली जातात. अशा वेळेस सरकारला रेल्वेने पाणी पोचवावे लागले आहे. दुष्काळामुळे होणारा सामाजिक ऱ्हास आणि वाहतुकीचा खर्च हिशोबात धरला तर पाण्याचे टंचाई–मूल्य परवडण्यासारखे होणार नाही. पाणीपट्टी आजच्या पेक्षा कित्येक पट वाढवावी लागेल. पण किंमत अशी अवाजवी वाढवूनही चालणार नाही, कारण श्रीमंतांना पाणी परवडले तरी गरिबांचे काय? आणि पाणीपट्टी वाढविली नाही तर काटकसरीने वापर कसा होईल? या विरोधाभासावर उपाय काढता येईल का?

**योग्य पाणीपट्टी ठरवायला कोणते निकष वापरावे ?**

येणाऱ्या काळात पाणी टंचाई टाळायची असेल तर त्याचे दर योग्य करण्याशिवाय पर्याय नाही. पण शुल्काचे नियोजन करताना काही मापदंड वापरले गेले तरच अन्यायकारक पाणीवाटप टाळता येईल. आज ढोबळ मानाने पाणी वापरणाऱ्यांचे वर्गीकरण करून सरसकट पाणीपट्टी आकारली जाते, यात पहिल्यांदा बदल झाला पाहिजे. जसा पाण्याचा सर्व व्यावसायिक वापर एकसारखा नसतो, तसाच शेतीचा वापरही भिन्न असतो. वापरातील भिन्नता शोधून त्याचे वर्गीकरण करता येते. यासाठी आकडेवारीचा आधार घ्यायला हवा. वर्गीकरणाची प्रथम पायरी म्हणजे शहरी आणि ग्रामीण वापर.

ग्रामीण भागात एग्रो क्लायमॅटिक विभाग, खरीप, रब्बी आणि उन्हाळी पिके, क्षेत्रफळ, सिंचन पद्धत असे मापदंड वापरून शुल्क आकारता येतील. हे घटक बदलले की पाणी वापर बदलतो. त्याच बरोबर भरमसाठ सिंचन लागणाऱ्या पिकांना वेगळा 'सेस' लावण्यात यावा. अशा पिकांचा विस्तृत अभ्यास संयुक्त राष्ट्रसंघाच्या फूड अँड अग्रिकल्चर ऑर्गानिझेशन (एफएओ) ने केला आहे. त्याचा वापर इथे करता येईल. असे केल्याने दरपत्रक मोठे होईल, पण तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला तर आकारणी आणि वसूली सहज शक्य होते.
ही व्यवस्था भूपृष्ठावरच्या पाण्याची झाली. यात जिराईत शेतीला पाणयाचे शुल्क लगू होत नाही.
भूजलावर शुल्क आकारणी करणे आज शक्य नाही, त्यासाठी काही पूर्वतयारी करावी लागेल.

व्यावसायिक आणि औद्योगिक वापरासाठी दोन मापदंड लावता येतील. पहिला म्हणजे जीएसटी वर्गीकरणाचा आधार घेणे – जीएसटी नियमावलीत वस्तू आणि सेवांचे गरजे पासून ते चैनी पर्यंत चार वर्ग केले असून प्रत्येक वर्गाला वेगळा कर आहे. व्यवसायाच्या प्रमुख उत्पादनांना जीएसटीचा कोणता दर लागू होतो त्यावर पाण्याचे शुल्क ठरविता येईल. ५ टक्के जीएसटीच्या स्लॅब मध्ये औषधे आणि घरगुती वस्तू येतात, या वस्तूंना सर्वात कमी दर आकारला जावा. १२ टक्के स्लॅबमध्ये संगणक आणि प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ सारख्या वस्तु येतात, त्यांना अधिक दर असेल. १८ टक्के वर्गात टूथपेस्ट, हेअर ऑइल, साबण, घरगुती क्लीनर सारख्या वस्तू, औद्योगिक यंत्रणा आणि कच्चा माल येतो. या उत्पादनात मोठे ब्रँडस आहेत आणि नफा ही अधिक असतो. आशा वस्तूंच्या उत्पादनात अधिक दर लावला जावा. २८ टक्के स्लॅब मध्ये सर्व चैनीच्या वस्तु आहेत – गाड्या, एसी, रेफ्रिजरेटर्स, विद्युत उपकरणे, सिगारेट, शीतपेय. या वस्तूंना सर्वाधिक दर असावा. या व्यतिरिक्त मायक्रो, स्मॉल अँड मीडियम एन्टरप्राइस कायद्यात (२००६) असलेले वर्गीकरण वापरुन मायक्रो (सूक्ष्म) उद्योगांना सर्वात कमी दर असावा.

फक्त पाणीपट्टी ठरविण्यासाठी जिएसटी वर्गीकरणाचा वापर करायचा. पाण्याचा दर ठरविणे आणि वसूली स्थानिक प्रशासनाकडे राहील, जीएसटी प्रणालीशी त्याचा काहीही संबंध नाही. या पद्धतीने गरजेच्या वस्तूंना पाणीपट्टी कमी असेल आणि चैनीच्या वस्तूंना जास्त. पंचतारांकित हॉटेल्स, गाड्यां आणि एसी अशा वस्तूंच्या उत्पादकांना अधिक पाणीपट्टी आकारली जाईल आणि सर्वात कमी दर मसाले, तेल, चहा, कॉफी सारख्या उत्पादकांना राहील. अशा शुल्क प्रणालीने

उद्योगधंद्यांना पाण्याचा पुनर्वापर करणे फायदेशीर ठरेल.

दुसरा निकष म्हणजे व्यावसायिक आणि औद्योगिक वापरात व्हॉल्युमेट्रिक प्राईसिंग म्हणजे घनवापरावर शुल्क वाढत गेला पाहिजे. ही पद्धत वीज महामंडळ वापरते. विजेचा वापर वाढला की एका युनिटची किंमत वाढत जाते. यामुळे वीज बचतीला प्रोत्साहन मिळते. म्हणजे प्रत्येक वर्गातील वापरकर्त्याच्या पाण्याचा वापर वाढला की दर वाढत जाईल.

शेती आणि औद्योगिक वापराचे शुल्क ठरले की फक्त घरगुती वापर बाकी राहतो. त्यासाठी प्रत्येक घराला मीटर बसविणे, जिथे शक्य नाही तिथे किमान पाणीपट्टी आकारणे या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. घरांचे वर्गीकरणही तीन स्लॅबमध्ये करता येईल – १००० चौरस फुटा पर्यंत, ३००० चौरस फुटा पर्यंत आणि तीन हजार पेक्षा मोठी घरं. या स्लॅब मधून पाणीपट्टी वाढत जाईल.

ग्रामीण भागात समन्यायी पाणी वाटप व्हावे यासाठी ग्राम गौरव प्रतिष्ठानचे श्री विलासराव साळुंखे यांनी पाणी पंचायतचे उत्कृष्ट प्रारूप यशस्वी करून दाखवले आहे. पाणीपट्टी ठरविताना त्याचे पहिले तत्व शेतकऱ्यांसाठी वापरणे अत्यंत गरजेचे आहे. ते म्हणजे प्रत्येक कुटुंबाला दर वर्षी ठराविक लिटर पाणी निशुल्क मिळालेच पाहिजे. त्या कुटुंबाच्या मालकीची जमीन, बाग किंवा शेत असो अथवा नसो. कुटुंबात असलेल्या व्यक्तींवर हा आकडा ठरविला जावा.

हे झाले पाणीपट्टी आकारणी बद्दल. परंतु फक्त दरपत्रक बदलून पाण्याचा वापर काटकसरीने होणार नाही. त्याची योग्य अमलबजावणी होण्यासाठी सक्षम कम्प्युटरिझेशन (संगणकीकरण) हवे. आज पूर्ण यंत्रणा व्यक्तिनिष्ठ आहे ज्यामुळे चुका होतात, मनुष्यबळ अपुरे पडते आणि चोरी शक्य होते. पाण्याच्या मीटरला आय.ओ.टी (इंटरनेट ऑफ थिंग्स) तंत्रज्ञानाचा वापर करून डेटा सहज गोळा करता येतो. यामुळे कमीतकमी मनुष्यबळ लागेल आणि पारदर्शकता येईल. नियमावलीतील अस्पष्टता घालविली आणि संगणकीकरण केले तर व्यक्तिनिष्ठता निघून जाईल आणि स्वैर अमलबजावणी शक्य होणार नाही. सार्वजनिक सोयीसुविधांच्या व्यवस्थापनात सिस्टीमचा वापर केला तरच अन्यायकारक पद्धती जाऊन समान उपभोग घेता येईल. दुष्काळ निवारणात खर्च करण्याऐवजी सरकारने या तंत्रज्ञानात खर्च करणे अधिक प्रभावी ठरेल. हवामान बदलाला तोंड देण्यासाठी अशा प्रकारचा 'प्रीव्हेनटिव्ह' म्हणजे प्रतिबंधात्मक खर्च केला नाही तर 'क्युरेटिव्ह' म्हणजे निवारक खर्च वाढत जाणार हे निश्चित.

पाण्याच्या दरातून त्याचे अंगभूत मूल्य (इंट्रीनसिक व्हॅल्यू) ग्राहकांना जाणवलेच पाहिजे, अन्यथा अपव्यय टळणार नाही आणि पाणी टंचाई पासून कधीही सुटका होणार नाही.

*****

